समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/१३६२
दिनांक २३/११/२०१६

# कार्यालयीन परिपत्रक

मा. मुख्य सभा ठराव क्र. ६९१ दिनांक २६/०९/२०१६ अन्वये महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना/उपक्रम/ कार्यक्रमांची अंमलबजावणी व कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली आहे.

मा. मुख्य सभा ठराव क्र. ६९१ दिनांक २६/०९/२०१६ नुसार महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना/उपक्रम/ कार्यक्रमांची अंमलबजावणी व कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या त्या त्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्याकरीता प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय पातळीवर खालीलप्रमाणे समिती गठीत करणेत आलेली आहे.

| | |
|---|---|
| १. मा. महापालिका सहाय्यक आयुक्त, | अध्यक्ष |
| २. क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३. समाजसेवक, समाज विकास विभाग | सदस्य सचिव |
| ४. प्रशासन अधिकारी | सदस्य |
| ५. सहाय्यक शिक्षण प्रमुख | सदस्य |
| ६. क्षेत्रिय आरोग्य निरीक्षक | सदस्य |
| ७. कनिष्ठ अभियंता | सदस्य |

विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम महिला सभासदांनी मागणी केल्यानुसार त्यांच्या प्रभागात पुणे महानगरपालिका संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत आयोजित करणे व आवश्यक तेथे तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे, त्यांचे मानधन देणे, आवश्यक साहित्य खरेदी करणे व तद्नुषंगिक खर्च करणेकरीता वरील समितीची मान्यता संबंधित क्षेत्रिय कार्यालय पातळीवर घेणेत यावी. सदर मा. मुख्य सभा ठराव क्र. ६९१ दिनांक २६/०९/२०१६ ची अंमलबजावणी मा. महापालिका सहाय्यक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचे नियंत्रणाखाली समाजसेवक, समाज विकास विभाग संपूर्ण समन्वय व उपक्रमाबाबतची पुर्तता करतील.

विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम राबविताना होणाऱ्या खर्चाकरीता समाज विकास विभाग मार्फत ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C125/SM1-33 (महिला सक्षमीकरण धोरणा अंतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना राबविणे (प्रत्येकी २० लाख)) या अर्थशिर्षकावर लॉकींग करून देणेत येईल.

कळावे.

23/11

अति. महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज./इ./वि.), पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अंमलबजावणीसाठी –**

१) मा. उप आयुक्त (परिमंडळ क्र. १ ते ४)
२) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)

23/11

**मुख्य समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

५-३६

नगरसचिव कार्यालय

**पुणे महानगरपालिका**
**महानगरपालिका सभा ठराव**

सभा क्रमांक :- ५० दिनांक :- २६/९/२०१६
विषय क्रमांक:-५७/७४३ ठराव क्रमांक:- ६९१ खाते - महा.आयुक्त

संदर्भ - १) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत करणेत आलेली तरतूद.
२) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/सविवि/५५५ दि.२०/९/२०१६ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२९४,दि.२०/९/२०१६

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना/उपक्रम/कार्यक्रमांची अंमलबजावणी व कार्यवाही करणेसाठी खालील बाबीस व मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या विषयपत्रासोबतच्या यादीस मान्यता देण्यात येत आहे.

१. महिला सक्षमीकरण धोरणा अंतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठीमा.अतिं.महा.आयुक्त(ज) यांच्या विषयपत्रासोबतच्या यादीप्रमाणे विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम राबविणेस. तसेच योजनांची अंमलबजावणी करणेकरीता मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची मान्यता घेणेस.
२. मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या विषयपत्रासोबतच्या तक्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करताना आवश्यक तेथे तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणेस, त्यांचे मानधन देणेस, आवश्यक साहित्य खरेदी करणेस व तद्नुषंगिक खर्च यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात उपलब्ध झालेल्या अर्थशिर्षक व तरतूदीमधून खर्च करणेस.
३. सदर विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम व तद्नुषंगिक होणारा खर्च ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE१४C१२५/SM१-३३ (महिला सक्षमीकरण धोरणा अंतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना राबविणे (प्रत्येकी २० लाख) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.
४. मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रम अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे, योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस.

मुख्य समाज विकास अधिकारी

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
04 OCT 2016

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

7/10/16

पि १ - ५

**FE14C125/SM1-33 (महिला सक्षमीकरण धोरणा अंतर्गत पुणे मनपातील मा. महिला सभासदांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी विविध योजना राबविणे (प्रत्येकी २० लाख)) या अर्थशिर्षका अंतर्गत करावयाची कार्यवाही/कामे**

| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| १) | शिक्षण, प्रशिक्षण व क्षमता बांधणी आणि जनजागृती. |
| अ) | व्याख्यानमाला.<br>• पुणे शहरातील विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ञ, अनुभवी व नामांकित महिलांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.<br>• पुणे शहरातील उच्च शिक्षित, शिक्षित व अशिक्षित, गरीब, गरजू, दुर्बल घटकातील महिलांना प्रोत्साहन देण्याकरीता व्याख्याने व कार्यशाळेचे आयोजन करणे.<br>• पुणे महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या इ. ८ वी ते इ. १० वी व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी/विद्यार्थीसाठी व्याख्यानेमालेचे आयोजन करणे.<br>• पुणे शहरात अभियांत्रिकी, आरोग्य, पर्यावरण, संगणक शिक्षण, शिक्षण, सामाजिक शिक्षण, व्यवसाय संबंधित शिक्षण या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या महिलांकरीता विशेष व्याख्यानांचे आयोजन करणे.<br>• ज्येष्ठ महिला यांच्याकरीता दैनंदिन आरोग्य, आहार व विहार या करीता विशेष तज्ञांचे मार्गदर्शन.<br>• पुणे शहरातील महिलांकरीता मुलांचे संगोपन, संस्कार, सामाजिक संरक्षण, महिलांचे कार्य व जबाबदाऱ्या, नवीन तंत्रज्ञानाची ओळख, युवती, स्त्रिया व चाळीशी नंतरच्या स्त्रिया यांचे आरोग्य विषयक मार्गदर्शन. |

| अ.क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उच्च शिक्षीत, शिक्षीत | सर्व क्षेत्रात कार्यरत महिला वर्ग | ८ | प्रति कार्यक्रम २५०००X८ = २०००००/- | यशदा/बार्टी/ शासकिय संस्था/ विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ शासकीय/सोसायटी / खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| २ | अशिक्षीत,गरीब,गरजु, दुर्बल घटकातील महिलांना | बचत गट, कचरावेचक संघटना, स्वच्छता कामगार महिला, मानधन तत्वावरील महिला, शेजार समूह गट स्वयंसेविका इ. | | | यशदा/बार्टी/ शासकिय संस्था/विद्यापिठ/ शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ शासकीय/सोसायटी /खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| ३ | १२ ते १५ वयोगटातील विद्यार्थीनींसाठी | सर्व शाळांमधील विद्यार्थीनींसाठी | | | यशदा/बार्टी/ शासकिय संस्था/विद्यापिठ/ शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६० वर्षे वयोगटावरील सर्व महिला | जेष्ठ महिलांसाठी | | | यशदा/बार्टी/ शासकिय संस्था/ विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ शासकीय/ सोसायटी/खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| ५ | १५ – ६० वर्षे वयोगटावरील महिला | युवती,स्त्रिया,जेष्ठ महिला | | | यशदा/बार्टी/शासकिय संस्था/विद्यापिठ/ शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |

ब **महिला सक्षमिकरण माहिती पुस्तीका तयार करणे.**

- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सर्व घटकातील महिला व पुरूष यांचे बचत गट स्थापन करणेत आले आहे.सदर बचत गटांमार्फत महिलांचे सबलीकरणाकरीता विशेष प्रयत्न केले जातात. यामध्ये पुणे महानगरपालिकेतर्फे बचत गटांना त्यांनी ठरवून घेतलेल्या योजना, व्यवसाय, विक्री, पणन, या करीता मार्गदर्शन करून स्त्रियांना सक्षम करण्याचा प्रयत्न करणेत येत आहे.
- बचत गट तयार करण्याची प्रक्रियेमध्ये महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळते व त्यांचेमध्ये असणाऱ्या सुक्त गुणांना, त्याचप्रमाणे शैक्षणिक व सामाजिक दृष्टिकोनातून समाजासाठी व स्वतःसाठी काम करण्याची संधी मिळते. यातून समाज व कुटुंब घडत असतो. ही सर्व प्रक्रिया पार पाडत असताना महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. त्यातून व्यवसाय उभे राहण्याची क्षमता अंगीकारते. अशा प्रयत्न व परिश्रमातून उभे राहिलेले बचत गट, महिला, कुटुंब, वस्ती समुह यांची एकत्रित माहिती समाज, नागरिक, अधिकारी, शासन, सामाजिक संस्था यांना मिळाल्यास यातून नवीन महिलांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळू शकते. सदर महिलांचे अनुभव विविध उपक्रमांसाठी मार्गदर्शक व पथदर्शक ठरू शकतात. त्यामुळे वरील बाबींसाठी माहिती पुस्तीका तयार करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | किमान संख्या | छपाई तपशिल | पुस्तीका छपाई संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | बचत/व्यवसाय गट माहिती | २० | १०० पानी ए ४ साईज ४ कलर रंगीत स्पेसिफिकेशन नुसार | १००० | २०००००/- |
| २ | बचत/व्यवसाय गट यांची व्यवसायीक यशोगाथा | २० | | | |
| ३ | समाज विकास विभाची विविध योजनांची माहिती | २० | | | |
| ४ | नविन उपक्रम माहिती | २० | | | |
| ५ | पुणे मनपा महत्वाचे दुरध्वनी | २० | | | |
| | | | | | |

क. **विविध क्षेत्रातील महिलांसाठी आरोग्य विषयक उपक्रम राबविणे.**

- वैद्यकीय क्षेत्रातील इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्याकडून महिलांच्या आरोग्य विषयक शिबीरे.
- पुणे महानगरपालिकेतील बचत गट, कचरावेचक संघटना, स्वच्छता कामगार महिला, मानधन तत्वावरील महिला, शेजार समूह गट स्वयंसेविका महिला व मुली इ. साठी त्यांचे मागणी नुसार संपूर्ण आरोग्य तपासणी शिबीर.
- पुणे शहरामध्ये शासकीय व खाजगी आस्थापनावर अधिकारी, कर्मचारी यांच्या करीता मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणे.

१०/१-ए

| अ.क्र. | तपशिल | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महिलांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन (स्तन कर्करोग, लोह कमतरता, सर्व्हायकल कॅन्सर व ईतर ) | सर्व महिलांसाठी (युवती, स्त्रीया, जेष्ठ महिला) | ८ | २५०००X८= २०००००/- | यशदा/बार्टी/शासकिय संस्था/विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| २ | महिलांसाठी आरोग्य तपासणी (स्तन कर्करोग व सर्व्हायकल कॅन्सर) | सर्व महिलांसाठी (युवती, स्त्रीया, जेष्ठ महिला) | | २०००००/- | पुणे मनपा यांचे हॉस्पीटल व यांचेकडील नांदेणीकृत शहरातील खजगी हॉस्पीटल / आयएमए | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |

| अ.क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महिलांसाठी १५ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम, ब्युटीपार्लर इंटरनेट, इ. | इ. १५ ते ३५ वयोगटातील मुली/स्त्रीया (१ दिवसिय प्रशिक्षण) | | ५००००/- | यशदा/बार्टी/शासकिय संस्था/विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| २ | छोटे व्यवसाय करणेबाबत मार्गदर्शन, व्यवसाय वृध्दी, विक्री प्रशिक्षण | | | | यशदा/बार्टी/शासकिय संस्था/विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| ३ | एम.एस.सि.आय.टी. प्रशिक्षण मुलींना वयोगट १५ ते ४५ | प्रत्येकी ३०००/- रु. फि अनुदान | | २०००००/- | यशदा/बार्टी/शासकिय संस्था/विद्यापिठ/शैक्षणिक नामांकीत संस्था | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |

नि - ११

| ड. | महिला, मुली व ज्येष्ठ नागरीक महिलांकरीता सामाजिक सुरक्षितता याबाबत प्रकल्प राबविणे. |
|---|---|
| | मनपा सुरक्षा विभाग व पोलीस यांच्या सहकार्याने पुणे शहरातील प्रत्येक प्रभागाशी संबंधित पोलीस स्टेशन पातळीवरती पथक तयार करणे. |

| अ.क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मुली, महिला व जेष्ठ महिला | मुली, महिला व जेष्ठ महिला | ३ (तिन दिवसीय) | ५०००० X३= १५००००/- | पुणे मनपा व पोलीस विभाग | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |

**उ) महिला सक्षमीकरणाअंतर्गत स्थानिक पातळीवर विविध योजना राबविणे व जनजागृती करणे**

- विविध आपत्ती, महिलां संबधी सुरक्षा व काळजी, उपाययोजना, वाहतूक व सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे त्यासाठी खालील बाबी करणेत येतील.
- भित्ती पत्रके, स्टिकर्स, पोस्टर्स, जिंगल, सोशल मिडीया जनजागृती, पथनाट्य
- महिलामध्ये सुरक्षितता व आत्मविश्वास वाढीस लागणेकरीता साहसी खेळ जसे की, रॉक क्लामबिग, सायकलिंग, पॅराग्लायडिंग व पॅरेशुट, कमाफिंग अशा साहसी प्रकारचे खेळ आयोजित करणे व याकरीता शासकीय नोंदनिकृत संस्थेचे सहकार्य घेणे.

| अ.क्र | तपशिल | किमान संख्या | रक्कम रुपये | खर्च करणेची पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | • विविध आपत्ती, महिला संबधी सुरक्षा व काळजी, उपाययोजना, वाहतूक व सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे त्यासाठी खालील बाबी करणेत येतील.<br>• भित्ती पत्रके<br>• स्टिकर्स<br>• पोस्टर्स<br>• जिंगल<br>• सोशल मिडीया जनजागृती<br>• पथनाट्य | १०००<br>१०००<br>१०००<br>१५<br>-<br>१५ | २०००००/- | • भित्ती पत्रके – १०००<br>• स्टिकर्स – १०००<br>• पोस्टर्स – १०००<br>• जिंगल – १५<br>• सोशल मिडीया जनजागृती<br>• पथनाट्य – १५ |
| २ | साहसी प्रकारचे खेळ आयोजित करणे व याकरीता शासकीय नोंदनिकृत संस्थेचे सहकार्य घेणे. | साहसी खेळ जसे की, रॉक क्लामबिग, सायकलिंग, पॅराग्लायडिंग व पॅरेशुट, कमाफिंग अशा | २०००००/- | विविध खेळांसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे १०००००/- (साहित्य खरेदी किमान मर्यादा रु.३०००/- प्रत्येकी)<br>खेळ प्रशिक्षण –१०००००/-<br>(प्रशिक्षणासाठी किमान मर्यादा रु.५०००/- प्रत्येकी) |

नि :- ९३

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उ. | स्थानिक पातळीवर व प्रभाग स्तरावर एखाद्या क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविलेल्या व्यक्ती, शासनाचे विविध पुरस्कार मिळविणारे व्यक्ती यांचा गौरव करणे व क्षेत्र स्तरावर यांचा सहभाग घेणे व उत्कृष्ट गायक, चित्रकार, सामाजिक क्षेत्रात कार्य केलेल्या व्यक्ती, शिक्षक, क्रिडा क्षेत्रातील व्यक्ती. | | | | |
| | कार्यक्रम | तपशिल | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | ठिकाण |
| १ | राष्ट्रीय /राज्य/स्थानीक पातळीवर विविध क्षेत्रातील व्यक्तींना उत्तम कार्यासाठी गौरवान्वीत करणे | प्रत्येकास मोमेंटो व कार्यक्रम इतर खर्च अनुक्रमे प्रत्येकी ५०००/- | ५ | १०००० X ५= ५००००/- | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/शासकीय/ सोसायटी/ खुल्या जागा/वस्ती समाज मंदिर/ मपना शाळा इ. |
| | | | | | |

**ख) विविध योजनांची अंमलबजावणी**

- सदर विक्री केंद्राचे ठिकाणी बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवता येईल. विक्री केंद्राकरीता आवश्यक साहित्य, व्यवस्थापक, मुलभूत सोयी-सुविधा करीताचा खर्च व तदनुषंगिक खर्च, बचतगटे व महिलांनी नाविन्याचा स्विकार करु शकणाऱ्या योजनांना प्राधान्य म्हणून करणे, जसे की, वितरक, सेवाक्षेत्रात काम करणे, व्यवसायात प्रदार्पण करणे.
- प्रकल्प अहवाल फी, शासकीय फी (शॉपअॅक्ट, विविध शासकीय फी, परवान्याची फी इ.) यासाठी विविध नामांकीत संस्थांचे जसे की, मिटकॉन यासाठी विविध जिल्हाउद्योग केंद्र, दे आसरा, मार्गदर्शन फी इ. धोरणास मान्यता घेणे.

| | तपशिल | मुद्दे | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | बचत/व्यवसाय गटांच्या वृध्दीसाठी विपनन, विक्री इ.साठी नामांकीत संस्थांकडुन मार्गदर्शन घेणे | प्रोजेक्ट प्रोसेस फि, प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, प्रशिक्षण, मार्गदर्शन इ. बाबी<br>शासकिय/निमशासकिय/खाजगी संस्था सहभाग | कार्यशिल बचत/व्यवसाय गटास जास्तीत जास्त १००००/- रु. साहाय्य.<br>१५ गटांसाठी एकुण १५००००/- (बचत गट ५ वर्षापासुन कार्यरत असावा, मागील ३ वर्षाचे ऑडीट केलेले असावे एव किमान एक वर्षापासुन वस्तु विक्रींचा व्यवसाय करीत असणे आवश्यक. पुणे मनपा बचत बाजारात किमान वर्षातुन एकदा सहभाग आवश्यक. सर्व रेकॉर्ड अद्ययावत असणे आवश्यक) |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ग. | **वरील बचत गट, व्यवसायास समाज विकास विभागाअंतर्गत सर्व वस्तु यांचे ब्रॅंडिंग करणे.** | | |
| | तपशिल | मुद्दे | रक्कम रुपये |
| १ | बचत/व्यवसाय गटांच्या वस्तु विक्रीसाठी बाजारपेठ उपलबध्द करुन ब्रॅडींग करुने | वस्तु विक्री साठी बचत बाजार भरविणे, प्रदर्शन, जाहिरात (रेडीओ,पेपर,सोशल मिडीया) पत्रके, होर्डींग, पोस्टर्स, वेबसाईट इ. | २०००००/- |
| | | | |

मुख्य समाज विकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका